# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे- ४०११०१, दूरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८१९३०२८
ई-मेल: publichealth@mbmc.gov.in

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

जा. क्र. मनपा/ सार्व. आ.वि./ ८८१ / २०२५-२६ दि. २८.०७.२०२५

## // जाहीर सूचना //

**राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम (NTEP), १५ वा वित्त आयोग (नागरी आयुष्यामन आरोग्य मंदिर) व हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत ठोक मानधनावरील रिक्त पदे भरणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम (NTEP), १५ वा वित्त आयोग (नागरी आयुष्यामन आरोग्य मंदिर) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत करारतत्वावर ठोक मानधनावर खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे रिक्त पदे भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी अर्ज करण्यासाठी कळविण्यात येत आहे. जाहिरातीत पदापुढे नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या गुणपत्रके व प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रतींसह दि. २९/०७/२०२५ ते दि.२०/०८/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत सार्वजनिक आरोग्य विभाग, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१** येथे अर्ज सादर करावेत.

राखीव प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल, त्यामुळे सर्व प्रवर्गातील पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करावेत. पोस्टाने /टपालाने अर्ज स्वीकारण्यात येतील. शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही अर्ज स्वीकारण्यात येतील. मात्र विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत किंवा प्राप्त होणा-या अर्जांचा भरती प्रकियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पोस्टाने/टपालाने अर्ज स्वीकारण्यात येतील. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत किंवा प्राप्त होणाऱ्या अर्जांचा भरती प्रकियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

### १. राष्ट्रीय आरोग्य अभियान

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | ठोक मानधन (प्रतिमहा) (रु.) |
|---|---|---|---|
| १ | क्षकिरण तज्ज्ञ Radiologist | १ | ७५,०००/- |
| २ | बालरोग तज्ज्ञ Paediatrician | १ | ७५,०००/- |
| ३ | सूक्ष्मजीव शास्त्रज्ञ Microbiologist(MD) | १ | ७५,०००/- |
| ४ | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी | १२ | ६०,०००/- |
| ५ | साथरोग तज्ज्ञ Epidemiologist | १ | ३५,०००/- |
| ६ | दंतशल्य चिकित्सक Dentist | १ | ३०,०००/- |
| ७ | सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक | २ | ३२,०००/- |
| ८ | परिचारिका (महिला) | ६ | २०,०००/- |
| ९ | परिचारिका (पुरुष) | २ | २०,०००/- |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ४ | १७,०००/- |
| ११ | औषध निर्माता | २ | १७,०००/- |
| १२ | प्रसविका | ६ | १८०००/- |

### २. राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम (NTEP)

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | ठोक मानधन (प्रतिमहा) (रु.) |
|---|---|---|---|
| १ | औषध निर्माण अधिकारी | १ | १७,०००/- |
| २ | वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक | १ | २०,०००/- |
| ३ | क्षयरोग आरोग्य कार्यकर्ता | १ | १५,५००/- |

### ३. १५ वा वित्त आयोग (नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर)

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | ठोक मानधन (प्रतिमहा) (रु.) |
|---|---|---|---|
| १ | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी | २१ | ६०,०००/- |
| २ | परिचारिका (महिला) | २३ | २०,०००/- |
| ३ | परिचारिका (पुरुष) | ३ | २०,०००/- |
| ४ | MPW (male) | ३१ | १८,०००/- |

### ४. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | ठोक मानधन (प्रतिमहा) (रु.) |
|---|---|---|---|
| १ | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी | ३ | ६०,०००/- |
| २ | परिचारिका (महिला) | ३ | २०,०००/- |
| ३ | MPW (male) | ३ | १८,०००/– |

सदरकामीची सविस्तर जाहीर सूचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या https://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**अर्ज स्वीकारण्याचा पत्ता: सार्वजनिक आरोग्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे- ४०११०१.**

जा. क्र. मनपा/ मावज/जाहि./ई- ६२३३०६३/२०२५-२६ सही/-
दि. २५/०७/२०२५ **(डॉ. प्रमोद पडवळ)**, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Mahabharti.in